मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कुंदन दिवे, आकर्षक पणत्यांनी सजल्या बाजारपेठा

## प्रकाशाचा सण असणाऱ्या दिवाळीचा पणत्यांची आरास हा अविभाज्य भाग : आकर्षक डिझाईनच्या पणत्या सध्या बाजारात दाखल झाल्या आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रकाशाचा सण असणाऱ्या दिवाळीचा पणत्यांची आरास हा अविभाज्य भाग आहे. दिवाळीला आकाशदिव्यांसोबचत विजेची रोषणाई सर्रास केली जाते. मात्र, दिवाळीची खरेदी ही पणत्यांशिवाय पूर्ण होत नाही. साध्या मातीच्या पणत्यांपासून ते पितळेच्या पणत्यांपर्यंत विविध आकारातील व आकर्षक डिझाईनच्या पणत्या सध्या बाजारात दाखल झाल्या आहेत दिव्यांच्या एका सेटची किंमत दोनशे ते पाचशे रुपयांपर्यंत आहेत. याशिवाय गोलाकार पणत्याचा आकार असलेले मेटलचे मोठ्या आकारातील तबकाचा सध्या ऑनलाइन मार्केटमध्ये ट्रेंड आहे. याची किंमत पाचशे रुपयांपासून पुढे आहे. पणत्यांपासून ते पणत्यांचे झुंबर, पाना-फुलांच्या आकारातील पणत्या, हँगिंग पणती अशी



### पणत्यांमध्ये विविध प्रकार

» दिवाळीत दारात, खिडक्यांमध्ये, गच्चीवर, रांगोळीच्या बाजूने कलात्मक पद्धतीने पणत्यांची आरास केली जाते. यामध्ये दारात ठेवण्यासाठी जगलक्ष्मी, समई, गणपती, मोर यांच्या आकारात बनवलेल्या पणत्या बाजारात दाखल झाल्या आहेत. तर घरात सजावटीसाठी पाण्यावरील पणत्या, लोटस दिवे, रिफ्लेक्शन दिवे, काचेचे दिवे यांची मागणी यंदा वाढली आहे. या दिव्यांच्या एका सेटची किंमत दोनशे ते पाचशे रुपयांपर्यंत आहेत. याशिवाय गोलाकार पणत्याचा आकार असलेले मेटलचे मोठ्या आकारातील तबकाचा सध्या ऑनलाइन मार्केटमध्ये ट्रेंड आहे. याची किंमत पाचशे रुपयांपासून पुढे आहे.

### मातीच्या पारंपरिक पणत्या बाजारात दाखल

» डिझायनर पणत्यांसोबतच मातीच्या विविधरंगी पणत्या बाजारात मोठ्या प्रमाणात दाखल झाल्या आहेत. लाल मातीतील व टेराकोटाच्या साध्या पणत्यांपासून ते पणत्यांचे झुंबर, पाना-फुलांच्या आकारातील पणत्या, हँगिंग पणती अशी शंभरपेक्षा अधिक व्हरायटी बाजारात दाखल झाल्या आहेत.

“मेटल, काच, प्लॅस्टिकच्या पणत्यांसोबत मी दरवर्षी आवर्जून मातीच्या पणत्यांची खरेदी केली. या वेळी तुळशीमध्ये ठेवण्यासाठीही विविध प्रकारच्या पणत्या बाजारात आलेला आहे.”

- गीता कानगुडे, ग्राहक, निगडी.

“या वर्षी मातीच्या पणत्यांमध्ये भरपूर प्रकार उपलब्ध झाले आहेत. याची किंमत अगदी पन्नास रुपये डझनपासून ते पाचशे रुपयांपर्यंत आहे. या वर्षी दरामध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

- अरुणसिंह विक्रेता.

शंभरपेक्षा अधिक व्हरायटी बाजारात दाखल झाल्या आहेत.

# प्रतिभा महाविद्यालयाच्या प्राध्यापकांचे पेटंट मिळवण्यात यश...

## यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांनी प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड येथील प्रतिभा शैक्षणिक संकुलाच्या प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीजचे प्रा. रोहित आकोलकर आणि प्रा. अनिता विश्वकर्मा यांना वाणिज्य क्षेत्रातील स्मार्ट मार्केटिंग मॅनेजमेंट असिस्टंट या विषयावर पेटंट प्राप्त झाले आहे.



प्रा. अनिता विश्वकर्मा | प्रा. रोहित आकोलकर | डॉ आशिष मेहता

यामध्ये अमरावती येथील श्रीमती केसरबाई लाहोटी महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.आशिष मेहता व डॉ.रचना राठी यांचा सुद्धा सहभाग आहे. या संशोधनाने मार्केटिंगच्या क्षेत्रात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवस्थापन अधिक सुलभ करता येईल. या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांनी प्राध्यापकांना शुभेच्छा दिल्या.

शैक्षणिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण संशोधनाला विशेष महत्त्व आहे, जितके अधिक संशोधन आणि नाविन्य असते, तितके शिक्षण व्यवस्थेत अधिक योगदान होते.

संशोधनाच्या या यशाने महाविद्यालयाचे नाव शैक्षणिक जगतात उंचावेल असून प्राध्यापकांनी भविष्यातही अधिक संशोधन करून महाविद्यालयाला गौरव प्राप्त करून द्यावा, असे मत संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरिया आणि प्राचार्य डॉ. अरुणकुमार वाळुंज, उपप्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, विभाग प्रमुख डॉ. अनामिका घोष, प्रा. हनुमंत कोळी आणि डॉ. जयश्री मुळे यांनी व्यक्त केले.

# नवमतदारांनी घेतली मतदान करण्याची शपथ

## महापालिकेचा मतदार जनजागृती कार्यक्रम

**पिंपरी | प्रतिनिधी**

आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच आम्ही धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू”, अशी शपथ चिंचवड येथील संघवी केसरी महाविद्यालयात नवमतदार विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी घेतली.



सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने मतदार जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. आज चिंचवड येथील संघवी केसरी महाविद्यालयात मतदान जनजागृतीचा कार्यक्रम पार पडला, यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश पवार, महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, महापालिकेचे मुख्य लिपिक देवेंद्र मोरे, किशन केंगले, लिपिक अभिजित डोळस, विकास गायकांबळे , सचिन महाजन, पियुष घसिंग यांच्यासह महाविद्यालयातील शेकडो नवमतदार विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मताच्या अधिकाराचे महत्व पटवून सांगण्यात आले. तसेच लोकशाहीतील मताचा अधिकार नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी कसा महत्वपूर्ण आहे. तसेच मताच अधिकार बजावणे हे आपले हक्क तर आहेच शिवाय महत्वपूर्ण कर्तव्य देखील असल्याचे, विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

महापालिकेच्या वतीने सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर ‘नो यूवर पोलिंग बूथ’ सुविधेद्वारे नागरिकांना आपल्या मतदान केंद्राबाबत माहिती दिली जाणार असून याद्वारे शहरातील पिंपरी, भोसरी, चिंचवड या मतदार संघातील मताचे सरासरी प्र माण वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

# सीसीटीव्हीनंतर सिग्नल यंत्रणाही कोसळली

## शहरात एका सिग्नलसाठी एक कोटी रुपये खर्च करूनही वाहतूक कोंडीमध्ये कोणताही फरक पडलेला नाही

**पुणे | प्रतिनिधी**

स्मार्ट सिटी अंतर्गत शहरातील वाहतूक नियंत्रित करण्यासाठी अॅडॅप्टिव्ह ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (एटीएमएस) सुरू करण्यात आली आहे. या सिस्टीमनुसार १२५ कोटी रुपये खर्च करून १२५ चौकात सिग्नल बसवण्यात आले आहे. मात्र ही यंत्रणा पूर्णपणे ढासळली असल्याचे वारंवार दिसून येत आहे. वीजपुरवठा खंडित होत असल्याने सिग्नल बंद पडत असल्याचा दावा कंपनीने करून जबाबदारी ढकलल्याने महापालिकेचा विद्युत विभाग चांगलाच वैतागला आहे.

शहरातील वाहतूक कोंडीला फोडण्यासाठी एटीएमएस सिस्टीमचा मोठा उपयोग होईल, असा विश्वास कंपनीने दिला होता. मात्र शहरात एका सिग्नलसाठी एक कोटी रुपये खर्च करूनही वाहतूक कोंडीमध्ये कोणताही फरक पडलेला नाही. त्यामुळे कंपनीच्या आणि महापालिकेच्या नावाने पुणेकर खडे फोडत आहेत. वारंवार यंत्रणा ढासळत असल्याने महापालिकेच्या विद्युत विभागाने कंपनीला याबाबतचा अहवाल सादर करण्याची सूचना केली होती, परंतु कंपनीने कोणताही अहवाल सादर केला नाही, असे विभागाचे म्हणणे आहे. आता कंपनीने विद्युत पुरवठा बंद होत असल्याच्या केलेल्या दाव्यावर महापालिका प्रशासनाने हरकत घेत पुढील तीन दिवसात सिग्नल का बंद पडले याचा व्यवस्थित अहवाल सादर करावा, सिग्नल यंत्रणेतील त्रुटी दूर कराव्यात अशा सूचना ठेकेदार कंपनीला दिल्या आहेत.

शहरातील वाहतूक कोंडीला पुणेकर चांगलेच वैतागले आहेत. काही केल्या वाहतूक कोंडीतून मोकळा श्वास घेता येत नसल्याने पुणेकरांची घुसमट होत आहे. सिग्नल यंत्रणाही साथ देत नसल्याने हताश होण्याची वेळ पुणेकरांवर आली आहे. कंपनीला अपेक्षेप्रमाणे महापालिकेला आणि पुणेकरांना अपेक्षित सेवा देण्यास अपयश आले आहे. असे असतानाच कंपनीने सिग्नल यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीसाठी १३ कोटी रुपयांची मागणी केली आहे, पण यंत्रणेचा फायदा होत नसल्याने महापालिकेने पैसे देण्याअगोदर यंत्रणेला अपयश का आले आहे, याबाबतची विचारणा केली असून कंपनीने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर तसेच पैशांच्या मागणीवर हरकत नोंदवली आहे. दरम्यान, वीज पुरवठा खंडित होत असल्याने सिग्नल बंद पडतात असे कंपनीने सांगितले आहे,



### सिग्नल यंत्रणेतील त्रुटीचा अहवाल तीन दिवसांत सादर करावा

» महापालिकेने ज्या फिडर पिलरमधून वीज जोडणी दिली तेथे वीजपुरवठा सुरळीत असताना सिग्नल कसे काय बंद पडतात, असा प्रतिप्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे कंपनीनेदेखील विद्युत विभागाकडे याबाबतचा अहवाल देण्याची मागणी केली आहे. महापालिकेने सर्व फिडर पिलर स्काडा सिस्टीमने जोडले आहेत, त्यामुळे दर २० मिनिटाला माहिती संकलित होते. त्यामुळे सिग्नल बंद पडण्यास वीज पुरवठा कारण नाही असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे सिग्नल यंत्रणेत काय त्रुटी आहेत याचा अहवाल पुढील तीन दिवसांत सादर करावा आणि त्यात दुरुस्ती करावी असे आदेश देण्यात आले आहेत.

> सिग्नल यंत्रणेसाठी स्मार्ट सिटीने १२५ कोटी रुपये खर्च केले आहेत. सिग्नल यंत्रणा बंद पडण्याचे कारण कंपनीला वारंवार विचारण्यात आले आहे. तसेच अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. परंतु कंपनीकडून अहवाल सादर केला जात नाही. कंपनीकडून योग्य सेवा मिळत नसेल तर त्यांना दंड करण्याचा अधिकार महापालिकेला आहे. आम्ही सर्व तांत्रिक गोष्टी तपासून घेऊन सिग्नल सुरू राहिले पाहिजेत यासाठी प्रयत्नात आहोत. कंपनीच्या चुका असतील तर त्यांना दंडही केला जाईल, त्यानंतर १३ कोटी रुपये देण्याचा निर्णय होईल.
>
> \- मनीषा शेकटकर, प्रमुख, विद्युत विभाग, पुणे महापालिका.

> सिग्नल यंत्रणेला होणारा विद्युत पुरवठा खंडित होत आहे. फिडर पिलर स्काडा सिस्टीमचा महापालिकेला अहवाल मागितला होता, त्यानुसार अहवाल कंपनीला मिळाला आहे, त्यानुसार आता कंपनीकडून अहवाल सादर केला जाईल. महापालिकेने २५ ते ३० फिडरचा अहवाल दिला होता. आता १२५ सिग्नलचा अहवाल सादर करण्यास महापालिकेने सांगितले आहे. येत्या चार ते पाच दिवसात महापालिकेला अहवाल सादर केला जाईल. सिग्नल यंत्रणेतील सर्व फिचरची माहिती प्रशासनाल देण्यात आली आहे. त्यानुसार यंत्रणेत कोणताही बिघाड झालेला नाही.
>
> \- चेतन शर्मा, प्रोजेक्ट मॅनेजर, बीटीएल कंपनी.

# ससूनच्या चार कोटींचा अपहार करणाऱ्यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला

## सत्र न्यायालयाने दिला आदेश : जुलै 2023 ते जानेवारी 2024 या कालावधीत घडला होता

**पुणे | प्रतिनिधी**

ससून रुग्णालयाच्या चार कोटी १८ लाख रुपयांचा अपहार करणाऱ्या १३ जणांचा अटकपूर्व जामीन अर्ज सत्र न्यायालयाने फेटाळला. सत्र न्यायाधीश डी. पी. रागीट यांनी हा आदेश दिला. जुलै २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीत घडला होता. प्रकार याप्रकरणी सप्टेंबर महिन्यात २५ जणांवर गुन्हा दाखल झाला होता.

रुग्णालयाच्या वरिष्ठ सहायक रोखपाल सुलक्षणा चाबुकस्वार, कक्षसेवक नीलेश शिंदे, अधिपरिचारिका सुमन वालकोळी, अर्चना अलोटकर, वरिष्ठ लिपिक दीपक वालकोळी, संतोष जोगदंड, दयाराम कछोटिया, कनिष्ठ लिपिक श्रीकांत श्रेष्ठ, सेवानिवृत्त सीटी स्कॅन तंत्रज्ञ उत्तम जाधव, वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक संदीप खरात, तसेच अनिता शिंदे, शेखर कोलार, राखी शहा या व्यक्तींचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे. याप्रकरणी ससूनचे प्रशासकीय अधिकारी गोरोबा आवटे यांनी फिर्याद दिली आहे. या प्रकरणाची वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने चौकशी केली होती. ससून रुग्णालयाच्या शासकीय नोंदवहीत आर्थिक तफावत असल्याची तथ्ये या चौकशीमधून समोर आली होती. या चौकशी अहवालाच्या आधारे रुग्णालय प्रशासनाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, सर्व कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते

गुन्हा दाखल झालेल्यांपैकी तेरा आरोपींनी अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केला. त्याला अतिरिक्त सरकारी वकील लीना पाठक यांनी विरोध केला. या गुन्ह्याची व्याप्ती मोठी असून, आरोपींनी संगनमताने हा गुन्हा केला आहे. या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे, रुग्णालयाच्या बँक खात्यातून अपहार केलेल्या रकमेचा आरोपींनी काय विनीयोग केला, त्यांनी ती रक्कम कोणाला दिली आहे का, या मुद्द्यांचा तपास करावयचा आहे. त्यासाठी आरोपींची कोठडीत चौकशी आवश्यक असून, आरोपींना अटकपूर्व जामीन मिळाल्यास तपासात अडथळे येण्याची शक्यता आहे, असा युक्तिवाद अतिरिक्त सरकारी वकील लीना पाठक यांनी केला. तो ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला.



# तब्बल 128 कोटी रुपयांच्या सोन्याची टेम्पोतून वाहतूक..

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांच्या हाती मोठ 'घबाड'...

**पुणे | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी केलेल्या नाकाबंदीत पुण्यातील सहकारनगर भागातून तब्बल १२८ कोटी रुपयांचे सोने जप्त करण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर सोने कोठे नेण्यात येत होते. यादृष्टीने तपास सुरू आहे.

नाकाबंदीत सहकारनगर पोलिसांनी शुक्रवारी १२८ कोटी रुपयांचे सोने जप्त केले आहे. याबाबतची माहिती निवडणूक अधिकारी आणि प्राप्तिकर विभागाला कळविण्यात आली आहे, अशी माहिती परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी दिली.

सहकारनगर भागात शुक्रवारी सकाळी एका टेम्पो चालकाला नाकाबंदीत पोलिसांनी अडवले. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली. तेव्हा वाहनात मोठ्या प्रमाणावर सोने असल्याचे आढळून आले. नाकाबंदीतील पोलीस कर्मचाऱ्यांनी या घटनेची माहिती त्वरीत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना दिली. पोलिसांनी सोने, तसेच टेम्पो जप्त केला आहे. कोट्यवधी रुपयांचे सोने कोठून आणले, तसेच ते कोणाला देण्यात येणार होते, यादृष्टीने तपास सुरू आहे. टेम्पो एका वाहतूकदाराचा असल्याची माहिती मिळाली आहे.

दरम्यान मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर खेड शिवापूर परिसरात ग्रामीण पोलिसांनी एका मोटारीतून पाच कोटी रुपयांची जप्त केली होती. मावळ तालुक्यात पावणे अठरा लाखांची रोकड जप्त केली होती.



# मोशीकर आमदार महेश लांडगे यांच्या एकजुटीने पाठीशी!

## माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे यांच्यासह ग्रामस्थांची भावना : मोशी परिसराच्या विकासाला चालना म्हणून आमची साथ

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी येथील ६५० बेडचे हॉस्पिटल, न्यायालय संकुल, अभियांत्रिकी कॉलेज, आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, संविधान भवन यांसारख्या अभिनव प्रकल्पांची उभारणी भोसरी मतदारसंघात करून आमदार महेश लांडगे यांनी मोशी सारख्या समाविष्ट गावांमध्ये विकासाचा नवा अध्याय सुरू केला आहे. विशेषतः पिंपरी चिंचवडच्या तुलनेत विकासाच्या प्रवाहात मागे पडलेल्या समाविष्ट गावांना विकासाचा अर्थ सांगणाऱ्या आमदार लांडगे यांच्या पाठीशी मोशी गाव एकजुटीने उभे राहणार आहे, असा निर्धार माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे यांनी व्यक्त केला.



भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ मोशी येथील श्री नागेश्वर महाराज मंदिरामध्ये समस्त ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये नारळ वाढवून प्रचाराचा 'श्री गणेशा' करण्यात आला.

गाव दौऱ्यामध्ये प्रचाराच्या निमित्ताने नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. फुलांची उधळण करत फटाक्यांच्या आतिशबाजीत आणि रांगोळ्यांच्या पायघड्यांनी आमदार महेश लांडगे यांचे नागरिकांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले. मोशी गावठाण येथून प्रचाराला सुरुवात झाली. शिवाजीवाडी, हवालदारवस्ती, सस्ते वाडी, आल्हाटवाडी, लक्ष्मीनगर, कुदळे वस्ती, सस्ते वस्ती येथील नागरिकांचा भेटीगाठी घेण्यात आल्या. यावेळी आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून मोशी कचरा डेपो येथे वेस्ट टू एनर्जी, बायोमायनिंग, बायोगॅस निर्मिती, सीएन्डडी वेस्ट प्रकल्प कार्यान्वयीत करण्यात आला. बफर झोनची हद्दी कमी केली. त्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करता आल्या. यासह आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन केंद्र, संविधान भवन, पिंपरी-चिंचवड न्यायालय संकूल, आयआयएम कॅम्पस आणि विशेष म्हणजे जगातील सर्वांत उंच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा 'स्टॅच्यु ऑफ हिंदुभूषण' उभारण्यात येत आहे. त्यामुळे मोशी आणि परिसराचा लौकीक वाढला आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.

माजी उपमहापौर शरद बोऱ्हाडे म्हणाले की, 1997 मध्ये पिंपरी महापालिकेत मोशी आणि परिसरातील गावे समाविष्ट झाली. महापालिकेमध्ये गावे समाविष्ट होऊन देखील गावांना विकासापासून वंचित रहावे लागले. 2014 नंतर खऱ्या अर्थाने विकासाचा अर्थ या समाविष्ट गावांना समजला. हा अर्थ आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून झालेल्या विकास कामातून मिळाला. आज सर्वाधिक मोठे विकास प्रकल्प भोसरी विधानसभेत आहेत. ज्यामध्ये मोशी परिसराचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या विकास प्रकल्पाच्या माध्यमातून मोशी तसेच आजूबाजूच्या समाविष्ट झालेल्या परिसराला महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक मोठे गृहप्रकल्प, ज्वेलर्स, ब्रँडेड कपडे व्यावसायिक मोशी परिसराला चांगला पर्याय म्हणून पहात आहेत. याचे सर्व श्रेय आमदार महेश लांडगे यांच्या दूरदृष्टीला जाते.

### आमदारांच्या विजयासाठी नागेश्वर महाराजांचा भंडारा हाती..

» मोशी परिसरात आमदार महेश लांडगे यांचा प्रचाराचा प्रारंभ श्री नागेश्वर महाराज मंदिरामध्ये नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने भंडारा उधळण्यात आला. श्री नागेश्वर महाराजांच्या साक्षीने ग्रामस्थांनी आमदार महेश लांडगे यांच्या विजयाचा भंडारा हाती घेतला आहे. तसेच, मोशीतून सर्वाधिक मतदान लांडगे यांना होईल. याद्दष्टीने आम्ही काम करीत आहोत, असा संकल्प स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

> “ आमदार महेश लांडगे यांनी भोसरी विधानसभेसाठी विविध विकास प्रकल्प या भागात आणले. सामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेतले आहे. महायुती सरकारच्या माध्यमातून राज्य सरकार अतिशय चांगले काम करत आहे. लाडकी बहीण योजना महिला भगिनींसाठी महत्त्वाची ठरत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आपले सरकार आणण्यासाठी आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी आम्ही सर्व एकजुटीने उभे राहणार आहोत.
>
> **- प्रा. कविता आल्हाट, महिला शहराध्यक्षा, राष्ट्रवादी अजित पवार गट.**

# युवा मतदार ठरवणार तिन्ही विधानसभेचे आमदार

## तरुण व प्रौढ मतदारांची संख्या अधिक : युवाशक्तीचा कौल ठरणार निर्णायक

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात १८ते १०० वयोगटांतील मतदार आहेत. त्यातील तरूण व प्रौढ मतदारांची संख्या अधिक आहे. नव्या पिढीतील युवा मतदारांचा कौल शहरासाठी तीन नवे आमदार ठरवण्यात महत्वपूर्ण ठरणार आहे.

निवडणूक विभागाकडून नवमतदारांची नोंदणी केली जाते. त्यासाठी महाविद्यालयात जनजागृती मोहिमा घेतल्या जातात. त्यामुळे नवमतदार व युवा मतदारांची नोंदणी मोठ्या संख्येने होत आहे. ही युवा शक्ती निवडणुकीचा निकाल बदलू शकते इतकी आहे. शहरातील एकूण १६ लाख ४७ हजार ८३७ मतदारांपैकी तरूण मतदारांची संख्या ३ लाख १२ हजार ६७४ इतकी आहे. सर्व गटातील मतदानांची तुलना करता मतदान करण्याचा युवक वर्गाचा आकडा सर्वाधिक असतो.

बोपखेल, दापोडीपासून ते निगडी प्राधिकरणापर्यंत पसरलेला पिंपरी विधानसभा मतदार संघात एकूण ३ लाख ८७ हजार ९७३ मतदार आहेत. त्यातील ६७ हजार ५२१ मतदार हे तरूण व नवमतदार आहेत. या नव्या पिढीचा कौल पिंपरीच्या नव्या आमदारांसाठी खूपच महत्वाचा ठरणार आहे. सांगवीपासून रावेत, किवळेपर्यंत असलेल्या दाट लोकवस्तीचा चिंचवड मतदार संघ आहे. राज्यात दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात जास्त मतदार असलेला म्हणून हा मतदार संघ ओळखला जातो. चिंचवड विधानसभेत ६ लाख ५६ हजार १५७ मतदार आहेत. त्यात १८ ते २९ वयाच्या युवक मतदारांची संख्या १ लाख १५ हजार ५३२ इतकी आहे. मतदार संघात ३० ते ३९ वयोगटातील मतदारांची सर्वात जास्त १ लाख ९३ हजार ५६० इतकी संख्या आहे. युवकांची पसंती ज्या बाजूला झुकणार आहे, तो चिंचवडचा नवा आमदार असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.



एमआयडीसी तसेच, समाविष्ट गावांचा समावेश असलेला भोसरी मतदार संघ आहे. मतदारसंघात ६ लाख ८४८ मतदार आहेत. त्यात १८ ते २९ वर्षांचे एकूण १ लाख २९ हजार ६२१ तरूण मतदार आहेत. या तरूण मतदारांचा कौल ज्या उमेदवारांकडे असेल, तो उमेदवार आमदार होऊ शकतो.

### पिंपरी विधानसभा

» एकूण मतदार - ३ लाख ८७ हजार ९७३
» १८ ते १९ वयोगटातील मतदार - ६ हजार १८२
» २० ते २९ वयोगटातील मतदार - ६१ हजार ३३९
» एकूण युवा मतदार - ६७ हजार ५२१

### चिंचवड विधानसभा

» एकूण मतदार- ६ लाख ५६ हजार १५७
» १८-१९ वयोगटातील मतदार-१२ हजार ७७७
» २० ते २९ वयोगटातील मतदार-१ लाख २ हजार ७५५
» एकूण युवा मतदार- १ लाख १५ हजार ५३२

### भोसरी विधानसभा

» एकूण मतदार - ६ लाख ३ हजार ७०७
» १० ते १९ वयोगटातील मतदार - १२ हजार ७००
» २० ते २९ वयोगटातील मतदार- १ लाख १६ हजार ९२१
» एकूण युवा मतदार - १ लाख २९ हजार ६२१

# पुणे शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाचा पुणे महापालिकेला पुरस्कार : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत वितरण

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय जल पुरस्कारामध्ये शहरी विभागात पुणे महापालिकेला तिसरा क्रमांक मिळाला आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार महापालिकेला देण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



गेल्या काही दिवसांपूर्वी पुणे महानगरपालिकेला हा पुरस्कार जाहीर झाला होता. पुणे शहराच्या सर्व भागांमध्ये समान दाबाने आणि २४ तास पाणीपुरवठा व्हावा, यासाठी महापालिकेच्या वतीने समान पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. २०४७ पर्यंतचा विचार करून, शहराची लोकसंख्या ५० लाख गृहीत धरून ही योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीनंतर शहरातील पाणी वितरणातील ४० टक्के गळती कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सध्या पुणे महापालिकेच्या वतीने शहरातील ७६ टक्के घरांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो. दररोज चार तास हा पाणीपुरवठा होतो. प्रति व्यक्ती १५७ लिटर पाणीपुरवठा केला जातो. पाण्याची होणारी गळती थांबवण्यासाठी आणि शहरातील सर्व भागांतील नागरिकांना समान पद्धतीने पाणी पुरवठा व्हावा यासाठी आतापर्यंत शहरातील ४३ टक्के नळजोडांवर मीटर बसविण्यात आले आहेत. महापालिका प्रशासनाकडून शहरातील नागरिकांना १०० टक्के दर्जेदार पाणी पुरविले जाते. तसेच नागरिकांकडून महापालिका प्रशासनाकडे पाणीपुरवठ्याबाबत आलेल्या ८५ टक्के तक्रारींचे निवारण केले जाते.

पुणे महापालिकेचे पाणीपट्टीच्या वसुलीचे प्रमाण ६० टक्के असून, महसूल न मिळणाऱ्या पाण्याचे (एनआरडब्ल्यू) प्रमाण ३० टक्के आहे, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. पाणीपुरवठ्याबाबत पालिका प्रशासन करत असलेल्या कामाची दखल घेऊन हा पुरस्कार पुणे महापालिकेला मिळाला असल्याचे या अधिकाऱ्यांनी सांगितले.

शहरात १०० टक्के रहिवासी भागात शौचालये असून, शौचालयांची एकूण संख्या सहा लाख १९ हजार ८२२ आहे. यात ८२२ कम्युनिटी, तर २९२ पब्लिक टॉयलेट्सचा समावेश आहे.

### 60 टक्के पाण्याचा पुनर्वापर

**» शहरातील ९८ टक्के भागांत सांडपाणी वाहिन्यांचे जाळे आहे. शहरात दररोज तयार होणाऱ्या ४७७ दशलक्ष लिटर प्रतिदिन सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. हे प्रमाण सुमारे ७५ टक्के इतके आहे. यापैकी ६० टक्के पाण्याचा पुनर्वापर महापालिकेच्या वतीने केला जातो. कृषी, सिंचन, बांधकाम, उद्याने अशा विविध माध्यमांतून हा वापर केला जात असल्याचे पालिकेतील अधिकाऱ्यांनी सांगितले.**

# आता महिन्यातून 10 दिवस दप्तराविना शाळा

## शालेय शिक्षणासाठी नवीन अभ्यासक्रम आराखडा : इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन प्रयोग

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या शिफारशीनुसार मार्गदर्शक तत्त्वे विकसित केली आहेत. ज्यामध्ये व्यावहारिक शिक्षणाकडे लक्षणीय बदल घडवून, शालेय शिक्षणासाठीच्या नवीन अभ्यासक्रम आराखड्यात इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'दप्तर नसलेले' १० दिवस प्रस्तावित केले आहेत.



एनईपीमध्ये व्यावसायिक कौशल्य शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रस्ताव आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना सुतारकाम, मातीची भांडी, विद्युत कामे आणि बागकाम यासारख्या कौशल्य-आधारित उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेणे हे या दहा दिवसांचे उद्दिष्ट आहे.

स्थानिक कारागीर आणि कारागिरांकडून शिकत असताना विद्यार्थ्यांना व्यावहारिक कौशल्ये प्राप्त करण्यात मदत करण्यावर या उपक्रमाचा भर आहे, असे सांगतानाच एका परिपत्रकात, शिक्षण विभागाने सर्व शाळांच्या प्रमुखांना सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळांमध्ये १० बॅगलेस दिवस लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.

एनसीईआरटीने आपल्या परिपत्रकात म्हटले आहे की, शालेय शिक्षण हा विद्यार्थ्यांसाठी अनुभवात्मक, आनंददायक आणि तणावमुक्त अनुभव बनवण्याचा उद्देश आहे. ज्यामुळे नवीन अभ्यासक्रम आराखड्यानुसार विद्यार्थी केवळ नवीन कौशल्ये शिकणार नाहीत तर पारंपरिक व्यवसाय आणि वारसा संरक्षणाची दृष्टीही मिळवतील. विद्यार्थ्यांना स्थानिक हस्तकला आणि सांस्कृतिक परंपरांचे महत्त्व समजून घेण्यास मदत करण्यासाठी हा दृष्टिकोन तयार करण्यात आला आहे.

ऑनलाईन व्यावसायिक अभ्यासक्रम आणि क्षेत्रभेटी विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या गतीने शिकणे सुरू ठेवण्यासाठी सुट्टीच्या काळात ऑनलाइन व्यावसायिक अभ्यासक्रमही उपलब्ध असतील. या व्यतिरिक्त, १० 'बॅगलेस' दिवस ऐतिहासिक स्मारके, सांस्कृतिक स्थळे, हस्तकला केंद्रे आणि पर्यटकांच्या आवडीच्या ठिकाणांच्या मैदानी सहलींसाठी वापरले जातील, ज्यामुळे विद्यार्थ्यांना वास्तविक जगाची ओळख मिळेल आणि त्यांना वर्गातील ज्ञान व्यावहारिक अनुप्रयोगांशी जोडण्यास मदत होईल.

कौशल्य शिक्षणाच्या दिशेने एक पाऊल शाळेचे मुख्याध्यापक व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाबाबत आशावादी आहेत, ज्याचा उद्देश सर्व विद्यार्थ्यांना कौशल्य-आधारित शिक्षणाचा परिचय करून देणे हा आहे. त्यांचा असा विश्वास आहे की व्यावसायिक विषय लवकर सुरू केल्याने केवळ विद्यार्थ्यांची व्यावहारिक कौशल्ये वाढणार नाहीत तर त्यांना विशिष्ट व्यवसायात करिअर करण्यासाठी देखील प्रेरणा मिळेल.

### पूरक उपक्रम: 'आनंदी शनिवार'

**» बॅगलेस डेज स्कूलची सुरुवात सध्याच्या आनंदी शनिवार (हॅपी सॅटर्डे) कार्यक्रमाशी सुसंगत आहे, जिथे शाळा इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासातून विश्रांती घेण्यासाठी आणि खेळ आणि उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करतात. हा उपक्रम शैक्षणिक शिक्षण आणि मनोरंजनात्मक उपक्रमांमध्ये समतोल साधून सर्वांगीण विकासाला चालना देतो आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कल्याणाला आणखी आधार देतो.**